23-02-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/22/2025 11:25 PM Page 1



# फोंडा परिसरात वन्य प्राण्यांचा वाढता संचार

## अडथळे निर्माण झाल्याने वन्य प्राणी शहरांकडे : स्थानिक नादरिकांचे म्हणणे

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २२** : गेल्या काही दिवसांपासून फोंडा शहरासह ग्रामीण भाग आणि महामार्गावरील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांवर जंगली गवे मुक्तसंचार करताना दिसत आहेत. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, महामार्ग विकास प्रकल्प, उंच संरक्षक भिंती, डोंगर उत्खनन आणि नैसर्गिक जलस्रोतांवर अडथळे निर्माण झाल्याने हे वन्य प्राणी शहरांकडे वळत आहेत.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, विकास हा स्वागतार्ह असला तरी तो करताना वन्य प्राण्यांसाठी आवश्यक असलेल्या कॉरिडॉरबाबत सरकारने विचार करायला हवा. प्राण्यांनाही जगण्याचा अधिकार आहे आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासात अडथळे आल्याने ते मानवी वस्त्यांमध्ये प्रवेश करतात, असे नागरिकांचे मत आहे.

अलीकडेच कुर्टी –बेथोडा ते बोरी मार्गाचे रुंदीकरण करण्यात आले. या प्रकल्पात संरक्षक भिंतींचे उभारणीसह डोंगर उत्खनन झाले आहे. त्यामुळे प्राण्यांसाठी त्यांच्या पारंपरिक मार्गांचा वापर कठीण झाला असून ते गावांमध्ये प्रवेश करत आहेत. फोंडा शहर, कुर्टी , ढवळी आणि परिसरात जंगली गवे वारंवार दिसत असून, बेतोडा येथे एका महिलेने त्यांना हाकलून लावण्याचा प्रयत्न केला असता ती किरकोळ जखमी झाली. सुदैवाने, अन्य कोणत्याही व्यक्तीवर हल्ला झाल्याची नोंद नाही.

सामाजिक कार्यकर्ते रोहन नाईक यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून बेथोडा आणि दुर्गाभाट परिसरातील तलाव व नाल्यांवर मोठ्या प्रमाणात संरक्षक भिंती उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे वन्य प्राण्यांचा पाण्याचा स्रोत कमी झाला आहे. परिणामी, ते पाणी आणि अन्नाच्या शोधात मानवी वस्तीकडे सरकत आहेत.पूर्वी बेथोडा , बोनबाग आणि दुर्गाभाट भागातील नैसर्गिक तलाव हे जंगली प्राण्यांसाठी महत्त्वाचे जलस्रोत होते. मात्र, वाढत्या अतिक्रमणामुळे आणि महामार्गाच्या विस्तारामुळे त्यांचा मार्ग अडवला गेला आहे. परिणामी, हे प्राणी आता मानवी वस्त्यांत अधिक प्रमाणात दिसून येत आहेत.

फोंडा बायपास महामार्गाचे रुंदीकरण झाले असले तरी तीनही बायपास रस्त्यांवर वन्य प्राण्यांसाठी कोणतेही कॉरिडॉर उपलब्ध नाहीत. त्यामुळे हे प्राणी शहरांत व ग्रामीण भागांत भटकताना दिसत आहेत. स्थानिक रहिवासी राहुल नाईक यांनी सांगितले की, विकास प्रकल्प राबवताना फक्त माणसांचा विचार केला जातो, पण वन्य प्राण्यांसाठी कोणतीही उपाययोजना केली जात नाही. महामार्गाच्या मध्यभागी अडथळे आल्यामुळे प्राण्यांना ते पार करणे कठीण होते, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे जंगल परिसरावर अतिक्रमण वाढत आहे. महामार्गांचे रुंदीकरण, डोंगर उत्खनन आणि भूखंडांचे वाढते विकसन यामुळे वन्य प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. परिणामी, हे प्राणी अन्न आणि पाण्याच्या शोधात मानवी वस्तीत प्रवेश करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, भविष्यात अशा समस्यांना आळा घालण्यासाठी वन्यजीवांसाठी स्वतंत्र कॉरिडॉर आणि जलस्रोत संरक्षित ठेवण्याची गरज आहे. यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# रूपांतरण सनद प्रक्रियेस गती देण्याचे पर्यावरण मंत्र्यांचे निर्देश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२** : दक्षिण जिल्ह्यात प्रलंबित अर्जांचा त्वरित निपटारा करण्यासाठी आणि जमीन रूपांतरण सनद देण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी पर्यावरण मंत्री अलेक्सो सिक्केरा यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित साप्ताहिक दरबारात बोलताना मंत्री सिक्केरा यांनी सांगितले की, वन, कृषी, शहर आणि ग्राम नियोजन (टीसीपी) विभागांकडून वेळेत अनापत्ती प्रमाणपत्र (एनओसी) न मिळाल्याने रूपांतरण सनद प्रक्रियेत विलंब होत आहे. त्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याशी चर्चा केल्याचेही स्पष्ट केले.

प्रथम टप्प्यात, दक्षिण जिल्हाधिकारी कार्यालय वन, कृषी आणि टीसीपी विभागांकडे प्रलंबित प्रकरणांची एकत्रित यादी पाठवेल. झोनिंगशी संबंधित बाबींसाठी टीसीपी विभाग जबाबदार असला तरी, त्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब टाळण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे सिक्केरा म्हणाले. तसेच, प्रलंबित अर्जांचा जलद निपटारा करण्यासाठी प्रणाली अधिक सुव्यवस्थित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

गृहनिर्माण प्रकल्पांशी संबंधित नियमितीकरण प्रक्रियेसही याच निकषांनुसार हाताळता येईल, असे त्यांनी सूचित केले. परीक्षण पॅनेलमधील सर्व सदस्यांना प्रत्यक्ष पाहणीपूर्वी एकत्र आणण्यासाठी मी एक प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गोवा वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या शवागारात पडून असलेल्या १७ मृतदेहांच्या विल्हेवाटीचा प्रश्न मार्गी लागल्याची माहिती सिक्केरा यांनी माध्यमांना दिली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. साप्ताहिक दरबारात मंत्री सिक्केरा यांच्याकडे माजोर्डा –उतोर्डा– गावातील कमी पाण्याच्या दाबासंबंधी तक्रारी प्राप्त झाल्या. यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली.

याशिवाय, ओसिया कमर्शियल इमारतीतील लिफ्टबाबत निर्माण झालेल्या समस्येवर लवकरच तोडगा निघणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एसजीपीडीएकडून नवीन लिफ्ट बसवण्याच्या कामाला गती देण्यात येईल. तसेच, मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी परिवहन विभागाला दुसऱ्या लिफ्टबाबत त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत, असे मंत्री सिक्केरा यांनी सांगितले.

# डिजिटल पेमेंटने होणार वाहतूक दंड वसूली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** वाहतूक दंड वसूल करण्यासाठी गोवा पोलिसांनी कॅशलेस व्यवहार अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. पाच वर्षांपासून या प्रणालीचा वापर सुरू असताना, काही अनियमितता समोर आल्याने हा बदल करण्यात आला आहे. विशेषतः, डिचोली पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका महिला पोलिस कॉन्स्टेबलवर वाहतूक दंड म्हणून वसूल करण्यात आलेल्या १७.३० लाख रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. आता नवीन आर्थिक वर्षापासून वाहतूक दंडाची वसुली पूर्णतः डिजिटल माध्यमातूनच केली जाणार आहे.

२०२० मध्ये मॅन्युअल चलन प्रणालीऐवजी ई–चालान मशीनचा वापर सुरू करण्यात आला होता. या प्रणालीद्वारे रोख, डेबिट/क्रेडिट कार्ड आणि क्यूआर कोडद्वारे पेमेंट करण्याची सुविधा उपलब्ध होती. मात्र, यामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने विभागाला धोरण पुनरावलोकन करून सुधारणा करणे भाग पडले आहे.सुधारित प्रणालीअंतर्गत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना आता केवळ डिजिटल पद्धतीने – डेबिट/क्रेडिट कार्ड किंवा क्यूआर कोडद्वारे – दंड भरावा लागेल. तसेच, ज्यांना त्वरित पेमेंट करणे शक्य नाही, त्यांनी संबंधित वाहतूक कक्ष किंवा पोलिस ठाण्यात जाऊन दंड भरावा लागेल. येत्या आर्थिक वर्षात लागू होणाऱ्या या प्रणालीद्वारे रोख व्यवहारांवर पूर्णपणे निर्बंध येणार आहेत. यासाठी विभागाने एक विशेष खातेवही तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, जेणेकरून सर्व आर्थिक व्यवहारांचा स्पष्ट तपशील ठेवता येईल. ज्या वाहनचालकांचे चालान प्रलंबित आहे, त्यांनी अधिकृत वेबसाइटद्वारे ऑनलाइन पेमेंट करावे. उल्लंघन करणाऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर एसएमएस द्वारेही चालानाची माहिती पाठवली जाणार आहे.

डिचोली पोलिस ठाण्यात फेब्रुवारी ते डिसेंबर २०२४ दरम्यान झालेल्या १७.३० लाख रुपयांच्या गैरव्यवहारानंतर, गोवा पोलिसांनी २०२५–२६ आर्थिक वर्षापासून वाहतूक दंडासाठी पूर्णतः डिजिटल पेमेंट प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर अंतर्गत ऑडिटमध्ये ही गैरव्यवहाराची बाब समोर आल्यानंतर संबंधित महिला कॉन्स्टेबलला कोल्व्हेल एस्कॉर्ट सेलमध्ये बदली करण्यात आली. पुढील चौकशीनंतर तिचे निलंबन करण्यात आले आणि अपहार झालेली संपूर्ण रक्कम सरकारी तिजोरीत जमा करण्यात आली आहे.

# कुंभमेळ्यातील गंगा–यमुनेच्या पाण्याच्या स्वच्छतेवरून वाद

**प्रयागराज, दि. २२ :**

प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्यात गंगा आणि यमुना नदीच्या पाण्याच्या स्वच्छतेवरून वाद निर्माण झाला आहे. दोन वेगवेगळ्या अहवालांमुळे हा विषय अधिकच चर्चेत आला आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) ३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाला (एनजीटी) अहवाल सादर केला. त्यानुसार, गंगा आणि यमुनेच्या पाण्यात विहित प्रमाणापेक्षा कित्येक पट अधिक विष्ठा कोलिफॉर्म बॅक्टेरिया असल्याचे आढळले. मात्र, १८ फेब्रुवारीला उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाने एनजीटीला सादर केलेल्या अहवालात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा निष्कर्ष फेटाळण्यात आला.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने या विरोधाभासावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नवीन अहवाल मागवला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ फेब्रुवारी रोजी होणार आहे, तर २६ फेब्रुवारीला कुंभमेळा संपणार आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने कुंभमेळ्यादरम्यान संगम परिसर आणि इतर घाटांवरील पाण्याचे नमुने तपासले. १३ जानेवारी २०२५ रोजी घेतलेल्या नमुन्यांमध्ये १०० मिली पाण्यात ३३००० एमपीएन फेकल कोलिफॉर्म बॅक्टेरिया आढळले. सीपीसीबी नुसार दुषीत स्तर २५०० पर्यंत असतो. संगममध्ये घेतलेल्या चाचण्यांमध्येही १३००० एमपीएन आढळले. त्यामुळे हे पाणी स्नानासाठी अयोग्य असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नमूद केले.



सीपीसीबीच्या या अहवालावर उत्तर प्रदेश सरकारने आक्षेप घेतला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विधानसभेत हा अहवाल फेटाळत त्रिवेणी संगमचे पाणी केवळ आंघोळीसाठीच नव्हे, तर पिण्यासाठीही योग्य असल्याचे सांगितले. त्यांनी दावा केला की, संगम परिसरातील सर्व नाल्यांचे शुद्धीकरण करूनच पाणी सोडले जाते आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ पाण्याची गुणवत्ता सतत तपासत आहे.

याउलट, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी टीका करताना सांगितले की, भाजपच्या लोकांनी हे पाणी स्वतः पिऊन त्याच्या स्वच्छतेचा पुरावा द्यावा. विधानसभेत सपा नेते शिवपाल यादव यांनी सरकारवर गंगेला इव्हेंट मॅनेजमेंटचे केंद्र बनवल्याचा आरोप केला.

कुंभस्नानानंतर अनेकांना सर्दी, खोकला आणि तापाच्या समस्या जाणवू लागल्या आहेत. काही लोकांना जुलाब आणि पचनाच्या तक्रारींचा सामना करावा लागला. तज्ज्ञांच्या मते, मोठ्या प्रमाणात गर्दीमुळे आणि पाण्यातील जिवाणू संसर्गामुळे ही लक्षणे आढळू शकतात. यामुळे कुंभमेळ्यातील पाण्याच्या स्वच्छतेचा मुद्दा अधिकच गंभीर झाला असून, आगामी सुनावणीत एनजीटी काय निर्णय देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## निवडक

### हळर्ण येथे महाशिवरात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २२ : हळर्ण येथे वर्ष पद्धतीप्रमाणे महाशिवरात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि. २५ रोजी सकाळी श्री महादेव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर रात्री ९.३० वाजता महेश्वर नाट्य मंडळ हळर्णतर्फे कै. प्रा. वसंत कानेटकर लिखित मुकुंद परब दिग्दर्शित दोन अंकी ऐतिहासिक नाटक ‘इथे ओशाळला मृत्यू’ सादर केले जाणार आहे. या नाट्य प्रयोगात समीर नाईक, सुशांत परब, विजय परब, सार्थक परब, नितीन परब, सखाराम देसाई, प्रविण शिरोडकर, कृष्णा परब, गुणाजी परब, सचिन हळर्णकर व सोनिया बेतकेकर शेटये आदी कलाकार सहभागी होणार आहेत.

तसेच अर्जुन परब, विश्वास परब हे निर्माता तर शाम परब व सुशांत परब हे सूत्रधार आहेत. मंगळवार दि. २५ रोजी महाशिवरात्री दिनी सकाळी ७ वाजता धार्मिक विधी, तीर्थक्षेत्रावर तीर्थस्नान तसेच पलटदार अर्जुन परब, राजाराम परब, विश्वास परब, भूषण परब तसेच भाविकांतर्फे शिवलिंगावर अभिषेक, लघुरुद्र, संध्याकाळी ७ वाजता ह.भ.प. नामदेव बुवा कळंगुटकर यांचे सुश्राव्य कीर्तन तसेच रात्री ९.३० वाजता श्री ज्ञानेश्वर सावंत लिखित पंढरीनाथ नाईक दिग्दर्शित महेश्वर नाट्य मंडळ – हळर्णतर्फे महान पौराणिक नाटक संगीत शिवतेज सादर केले जाणार आहे. या नाट्यप्रयोगात मकरंद परब, ज्ञानेश्वर परब, राजन परब, वासुदेव शिरोडकर, पियुष परब, राज परब, स्नेहल गुरव कारखानीस, आत्माराम परब, हर्ष परब, प्रवीण परब, तुकाराम चव्हाण, यशवंत परब हे कलाकार सहभागी होतील.

या नाट्य प्रयोगास विश्वास मेस्त्री यांचे संगीत तर बबन आरोंदेकर तबला साथ करतील. पाश्वसंगीत सुखाजी परब, ध्वनी संकलन – तेजस परब (नेतर्डे). या प्रयोगांचे सूत्रधार राजाराम परब, मिलिंद परब हे असून सुभाष परब दयानंद परब हे नाट्य निर्माता आहेत. नाट्य प्रयोग महादेव मंदिराच्या प्रांगणात सादर होणार असून श्री महेश्वर नाट्य मंडळ व हळर्ण ग्रामस्थ व्यवस्थापक आहेत.

---

### गोवा ट्रायथलॉनसाठी आज रस्ते बंद आणि वाहतूक निर्बंध

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, २१ फेब्रुवारी: उत्तर गोव्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या कार्यालयाने ाळपळ जीरपसश अर्रिंचेसर क्रीडा स्पर्धेचा भाग म्हणून आयोजित गोवा ट्रायथलॉन संदर्भात रविवार, २३ फेब्रुवारी रोजी पणजी शहरात पुढीलप्रमाणे वाहतूक निर्बंध लागू केले आहेत:डॉ. जॅक डी सिक्केरा मार्गाच्या छ्खज सर्कल ते कॅम्पाल इनडोअर स्टेडियम या बीचसाइड लेनचा (डावीकडील भाग) केवळ शर्यतीसाठी वापर केला जाईल आणि हा मार्ग सकाळी ६ पासून शर्यत पूर्ण होईपर्यंत सामान्य वाहतुकीसाठी बंद राहील.

एनआयओ सर्कल ते कॅम्पाल गणेश पर्यंतच्या उजव्या बाजूच्या मार्गावर दोन मार्गांची वाहतूक सुरू राहील. एनआयओ सर्कल ते एसएसबी हॉस्पिटल बांबोळी या डॉ. ई. बॉर्जेस रोडच्या डाव्या बाजूच्या लेनचा सायकलिंग स्पर्धेसाठी विशेषतः वापर केला जाईल. ए

नआयओ सर्कल ते एसएसबी हॉस्पिटल बांबोळी या उजव्या बाजूच्या मार्गावर दोन मार्गांची वाहतूक सुरू राहील. दोना पावला येथून पणजीकडे जाणाऱ्या वाहनांना ऐवाओ जंक्शन येथे वळवण्यात येईल आणि ती जुना करंझाळे मार्ग – टोंका – ला कॅम्पाला मार्ग – स्टारबक्स जंक्शन, कॅम्पाल मार्गे पुढे जाऊ शकतील. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन वाहने निर्बाधपणे हालचाल करू शकतील. डॉ. ई. बॉर्जेस रोडवरील उजवीकडील लेन (एनआयओ सर्कल ते एसएसबी हॉस्पिटल बांबोळी) आणि एनआयओ सर्कल ते कॅम्पाल या दोन्ही मार्गांवर दोन मार्गांची वाहतूक सुरू राहील. संयोजकांना शंकुंच्या सहाय्याने वाहतूक विभाजन करणे व संपूर्ण मार्गावर आवश्यक मार्गदर्शक फलक उभारणे बंधनकारक असेल. कॅम्पाल ते छ्खज सर्कल आणि एनआयअ सर्कल ते एसएसबी बांबोळी या मार्गावर स्थानिक रहिवाशांसाठी स्वतंत्र वाहन मार्ग उपलब्ध करून दिला जाईल. तसेच, ठराविक ठिकाणी वाहन ओलांडण्यासाठी स्वयंसेवक तैनात करण्यात येतील.

---

### मडगावात उद्या ‘स्वर आले दुरुनी’ मैफल


■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२** : मडगावच्या नव्या बाजारातील मध्यवर्ती भव्य पिंपळकट्यावर सोमवारी दि. २४ रोजी संध्याकाळी ५ वाजता सार्वजनिक श्री सत्यनारायण महापूजा, पुराण, आरती व तीर्थ प्रसाद ६ वाजता रवींद्र भवन मडगाव व गोवा राज्याचे माजी मुख्यमंत्री व मडगावचे आमदार दिगंबर कामत तसेच फातोर्डाचे माजी आमदार व भाजपा गोवा राज्य प्रदेशाध्यक्ष दामोदर (दामू) नाईक यांच्या सौजन्याने स्वराभिषेक मडगाव निर्मित ‘स्वर आले दुरुनी भाव’, भक्ती,नाट्य, चित्रपटगीते, लावणी व गझल गीत गायनाची बहारदार मैफल आयोजित करण्यात आली आहे.

त्यात गोमन्तकीय प्रसिद्ध भजन गायक नरसिंह साने युवा गायक तेजस वेर्णेकर व भावगीत गायिका कल्पा सायनेकर गोब्रे आपली कला सादर करणार आहेत. त्यांना बाळकृष्ण मेस्त (कीबोर्ड), यतीन तळावलीकर (तबला/ढोलकी), शुभम नाईक (हार्मोनियम), पवन वळवईकर (पखवाज), अश्विन जाधव (ऑक्टोपॅड), देवेंद्र शिरोडकर (ध्वनीसंकल्पना) व निर्मिती प्रमुख निवेदक प्रदीप पंडित सुत्रनिवेदनाची बाजू सांभाळणार आहेत. कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभ सोहळ्याला मडगावचे आमदार व माजी गोवा राज्य मुख्यमंत्री दिगंबर कामत, फातोर्डाचे माजी आमदार व भाजपा गोवा राज्य प्रदेशाध्यक्ष दामोदर (दामू) नाईक, रवींद्र भवन मडगावचे अध्यक्ष राजेंद्र तालक उपाध्यक्ष मनोहर बोरकर व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संगीतप्रेमी रसिकांनी व भाविकांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खाण व्यवसायामुळे विस्मृतीत गेलेल्या रामनाथ देवस्थानात होणार शिवरात्र उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड







**डिचोली, दि. २२** : हजारो वर्षांचा इतिहास सांगणारे मात्र बेछूट चाललेल्या खाण व्यवसायामुळे विस्मृतीत गेलेले गावकरवाडा मुळगाव येथील रामनाथ देवस्थान पुन्हा एकदा उदयास आणण्याचा गावातील नागरिकांनी निर्धार केला आहे. एके काळी निसर्गाच्या कुशीत वसलेले हे देवस्थान व त्या समोर असलेले बारमाही मुबलक पाणी देणारे रामनाथ तळे गावाच्या सांस्कृतिक व धार्मिकतेचे प्रतीक होते.

मुळगाव गावाच्या बाजूलाच असलेल्या लामगाव गावातील बौद्ध लेणी आणि गुहेशी साम्य असलेले पुरातन असे सुमारे तीन फूट उंचीचे जांभ्या दगडात कोरलेले लिंग इथल्या धार्मिक वारशाची साक्ष देत आहे. इथे बारमाही असलेल्या मुबलक पाण्यामुळे कोणे काळी लामा किंवा बौद्ध भिक्षुकांनी या ठिकाणी वास्तव्य करून या लिंगाची इथे स्थापना केली असावी. सुमारे वीस पंचवीस वर्षापूर्वी वर्दळीचे ठिकाण असलेला हा जलसमृद्ध असा परिसर, बाजूलाच चालू असलेल्या खनिज उत्खननासाठी खोदलेल्या मोठमोठ्या खंदकामुळे पाण्याची पातळी खालावल्याने पूर्णपणे सुकून गेला आहे. आहे. तसेच काही वर्ष अगोदर खाण कंपनीने या ठिकाणी देखरेख करण्यासाठी कायम आपले वॉचमन ठेवल्याने गावातील लोकांनी सुद्धा हळूहळू या ठिकाणी जाणेच बंद केले. खाणीच्या विळख्यात सापडलेला हा परिसर आता पूर्णपणे झाडाझुडुपांमध्ये वेढला आहे.

येत्या २६ रोजी होणाऱ्या शिवरात्रीला पुन्हा इथे पूजा अर्चा करून उत्सव साजरा करण्याचे गावातील जागरूक नागरिकांनी ठरविले असल्याचे नवनिर्वाचित देवस्थान अध्यक्ष कृष्णा परब यांनी सांगितले, त्या दृष्टीने गावातील युवकांनी या देवस्थानच्या सभोवतालची जागा तसेच वाट साफ करण्याचे कामही सुरू केले आहे.

सदर देवस्थान तसेच गावाच्या शेतीला पाणी पुरविणारा मुळगावातील मुख्य तलाव, मधले तळे आणि इतर जलस्त्रोत, दाडदेवाचे ठिकाण वेदांत खाणीच्या लिझ मधे येत असल्याने गावाची संस्कृती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे सरकारने वेदांत कंपनीला अधोरेखित करून दिलेली लिझ रेखा या देवस्थानच्या किमान ५० मीटर बाहेर आखून द्यावी अशी विनंती मुळगाव नागरिक कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# धारगळ येथे होणार नवा अंडरपास

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२** : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने धारगळ येथे ४६ कोटी रुपये खर्चाच्या अंडरपास प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या सुविधेमुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि रस्ता सुरक्षेत सुधारणा होणार आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूत्रांनुसार धारगळ अंडरपाससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली, असून लवकरच कामाचा आदेश जारी केला जाईल. पुढील महिन्यात प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्याची अपेक्षा आहे.

पेडणेमधील न्हयबाग आणि म्हापसामधील पेडे येथेही अशाच स्वरूपाच्या सुविधा निर्माण करण्याची योजना आखण्यात आली असून त्यासाठी मंत्रालयाची अंतिम मान्यता बाकी आहे. न्हयबाग अंडरपास प्रकल्पास तत्त्वतः मान्यता मिळाली असून पेडेसाठी अंडरपास किंवा रोड ओव्हरब्रिज अशा दोन पर्यायांचा विचार केला जात आहे. वाहतुकीच्या अभ्यासानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. धारगळ अंडरपास हा सुरुवातीला महामार्गाच्या चौपदरीकरण प्रकल्पाचा भाग होता. मात्र, स्थानिक दुकानदारांच्या विरोधानंतर तो प्रकल्पातून वगळण्यात आला. परिणामी, वाहतूक कोंडी वाढली आणि प्रशासनास हा प्रस्ताव पुन्हा सादर करावा लागला.

दुसरीकडे, राष्ट्रीय महामार्ग–६६ वरील महत्त्वाच्या पेडे जंक्शनवर सतत अपघात होत असल्याने येथेही वाहतुकीसाठी उपाययोजना गरजेच्या बनल्या आहेत. सुरुवातीला महामार्ग योजनांमध्ये पेडेसाठी अंडरपास किंवा ओव्हरब्रिजचा समावेश नव्हता. मात्र, वाढत्या वाहतूक समस्येमुळे आता यावर पुनर्विचार सुरू आहे.

हळदोण मतदारसंघाचे आमदार कार्लोस फेरेरा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पेडे जंक्शनवरील वाहतूक समस्येचा मुद्दा उपस्थित केला. गडकरी यांनी या भागातील वाहतुकीची गरज ओळखून येथे रोड ओव्हरब्रिजसाठी सहमती दर्शवली आहे, असे फरेरा यांनी स्पष्ट केले.याशिवाय, पेडेसह इतर ठिकाणी वाहतूक व्यवस्थापनासाठी विविध उपाययोजना करण्याचा आढावा प्रशासन घेत आहे. यामध्ये दीर्घकालीन सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाणार आहे.

दरम्यान, धारगळ आणि न्हयबाग जंक्शनवर तात्पुरती वाहतूक सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. पेडे येथील सिग्नलही लवकरच सुरू होईल. या उपाययोजनांमुळे अंडरपास आणि ओव्हरब्रिजच्या अंतिम मंजुरीपर्यंत वाहतुकीची समस्या काही प्रमाणात नियंत्रणात राहील. याशिवाय, गोवा मेडिकल कॉलेज परिसरातही वाहतूक सुरळीत करण्यासाठी नवीन सिग्नल बसवण्याचे नियोजन आहे. विशेषतः शालेय वेळेत वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.